# • पश्चिम भारत विज्ञान जत्रा •

पश्चिम भारतातील महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, गोवा, राजस्थान तसेच दिव-दमण, दादरा,नगर,हवेली या केंद्रशासित प्रदेश यांच्या सहकार्यांनी नेहरू विज्ञान केंद्र,वरळी, मुंबई येथे पश्चिम भारत विज्ञान जत्रेचे आयोजन डिसेंबरमध्ये करण्यात येते.

**उदिदृष्टये** :- विज्ञानातील नवनविन क्षितिजांचा शोध घेण्यासाठी शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन करणे. वैज्ञानिक प्रश्न व समस्याचे निराकरण करणे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आधार घेउन विद्यार्थ्यांना मदत करण्याचे कार्य पश्मिच भारत विज्ञान जत्रा करीत आहे.

निवड व विद्यार्थी सहभाग :- दरवर्षी जिल्हास्तरीय प्रदर्शनामध्ये निवड झालेल्या

प्रदर्शनीय वस्तूमधून प्रदर्शनी वस्तू राज्य विज्ञान प्रदर्शनात सहभागी करण्यात येते. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातून माध्यमिक स्तरावरील इ.९ वी ते १२ वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या संशेधनात्मक नाविन्यपूर्ण अशा प्रकल्पामधून एकूण १० विज्ञान प्रकल्पाची.

( पैकी ५ वैयक्तिक प्रकल्प व ५ गट प्रकल्प ) राज्यस्तरीय प्रदर्शनात निवड करण्यात येते तसेच गुणानुक्रमे पहिल्या तीन अध्यापक निर्मिती शैक्षणिक साहित्य प्रकल्पाची ननिवड करण्यात येते. सदर निवड पात्र प्रकल्पास या जत्रेत सहभागी होण्याकरिता मा. संचालक, म.रा.शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांची मान्यता घ्यावी लागते.